नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.
दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्स: २२८८६६६६
ई-मेल: clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in ;
dclmms_complaints@yahoo.com

क्र. वैमाशा- साखर/आदेश/२०१४/ ७७९६ दिनांक-२९ डिसेंबर, २०१४

# आदेश

साखर कारखान्यांकडून वापरात असलेले वे-ब्रीज मेकॅनिकल टाईपचे असल्याने त्यांच्या संदर्भात अयोग्य तोलन केले जात असल्याच्या व या वे-ब्रीजमध्ये बदल करुन त्याचा गैरवापर केल्यामुळे ऊस उत्पादकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी वारंवार या कार्यालयास प्राप्त होतात. याबाबत सह आयुक्त, साखर यांचेशी चर्चा केल्यानंतर सदरची खरेदी, विक्री योग्य रित्या होण्यासाठी, महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम ४ मधील पोट नियम ४ अवये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

सर्व साखर कारखान्यांमध्ये वर्ग -३ अचुकतेच्या (Accuracy class-III) इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणांचाच वापर करणे बंधनकारक राहिल.

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितांच्या विरुध्द महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ च्या नियम २३ प्रमाणे कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

-सही-

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.